माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ, कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड संचलित "श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड" या बीएस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या नावात "श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग, माणगांव, जि. रायगड" असा बदल करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एनयुआर २०२४/प्र.क्र.६८५/२४/(ई-८६३५९९)/शिक्षण १

९ वा मजला, गो.ते.संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१

दिनांक : ३० जुलै, २०२५.

**वाचा** -:
१) शासन निर्णय क्र. एनयुआर २०२४/प्र.क्र.६८५/२४/(ई-८६३५९९)/शिक्षण १, दि.१५.०४.२०२५
२) शासननिर्णय क्र. एनयुआर-२०१२/प्र.क्र.६२७/१२/ शिक्षण-१, दि. १२.५.२०१३

**प्रस्तावना :-**

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ, कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड संचलित श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ६० (साठ) विद्यार्थी क्षमतेसह बीएस्सी (नर्सिंग) पदवी अभ्यासक्रम महाविद्यालय सुरु करण्यास दि.१५.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर संस्थेच्या अंतर्गत कार्यरत बीएस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या नावात "श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड" ऐवजी "श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग, माणगांव, जि. रायगड" असा बदल करण्याबाबतचा ठराव संस्था स्तरावर पारित करुन त्यानुसार बदल करण्याची विनंती शासनास केली होती. त्यानुषंगाने सदर महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ, कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड संचलित "श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड" हे बीएस्स्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम महाविद्यालय ज्या ठिकाणी सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे, त्याच ठिकाणी महाविद्यालय सुरु ठेऊन महाविद्यालयाच्या नावात "श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड" ऐवजी " श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग, माणगांव, जि. रायगड" असा बदल करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची मंजूरी देण्यात येत आहेः-

**अटी व शर्ती :-**

१) सदर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तसेच महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

२) संस्थेच्या रुग्णालयातील रुग्णांच्या व रुग्णालय प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

३) संस्थेच्या स्थावर-जंगम मालमत्तेत तसेच इतर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही.

४) संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात वरीलप्रमाणे बदल केल्यामुळे या संदर्भात भविष्यात कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

३०/७/२५

(प्रियंका कागिनकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
७. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई .
८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
९. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१०. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
११. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
१२. अध्यक्ष, माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ, कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड
१३. निवडनस्ती (शिक्षण-१).